नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 15/06/2021 (मंगळवार)
(सकाळ)

---

## विनयभंग

पो.स्टे. कुही:– दि. 06/06/2021 चे 02:30 वा. ते 03.00 वा. सुमारास 39 वर्षीय पीडित/फिर्यादी हिचे आरोपी नामे– 1) दिनकर पांडुरंग गाढवे, 2) राधिका दिनकर गाढवे दोन्ही रा. कुही यांचे सह जुन्या वादाच्या कारणावरून (रस्त्यावरून येणे जाणे करण्याच्या वादावरून) त्यांच्यात वादविवाद होउन त्यात आरोपीतांनी फिर्यादीला व फिर्यादीची मोठी जाउ यांना अश्लील शिवीगाळ करीत आरोपी क्रं. 1 याने फिर्यादीला हातबुक्यांनी मारहाण करीत तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

. सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 294, 354(अ), 354(ब), 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा पुजारी हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. बेला :– अंतर्गत 22 कि.मी अंतरावर मौजा सिर्सी येथे दिनांक 13/06/2021 चे 09.30 वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– ग.भा. इंन्दुबाई मारोतराव कामडी, वय 65 वर्ष, रा. सिर्सी त.उमरेड जि नागपुर हि खरकटे पाणी फेकत असतांना आरोपी क. 1) सौ बेबीबाई मनिराम कामडी हिने फिर्यादीला म्हटले की, ''माझे अंगावर खरकटे पाणी का फेकले'' या कारणावरून आरोपी क. 1) सौ बेबीबाई मनिराम कामडी, 2) सौ अर्चना राजेन्द्र जोधे, 3) चेतन मनिराम कामडी, 4) सचिन मनिराम कामडी, 5) राजेन्द्र नथ्थुजी मोघे, 6) मनिराम कामडी सर्व रा सिर्सी त.उमरेड जि नागपुर यांनी गैरकायदयाची मंडळी गोळा करून फिर्यादीला अश्लिल शिवीगाळ करून वेळवाचे काठीने डाव्या खांदयावर मारून जखमी केल्याने फिर्यादीचा डावा खांदा फ्रॅक्चर झाला. तसेच आरोपीतांनी फिर्यादीला जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीतांविरुध्द कलम 143,147,324,325,294,506,34 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सूरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. अशोक जाधव हे करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावर मौजा पंचखेडी उत्थान नागरी सहकारी पत संस्था मर्या नागपूर शाखा वसूली केंद्र येथे दिनांक 01/07/2011 ते दिनांक 01/04/2016 चे 11.00 वा. दरम्यान उत्थान नागरी सहकारी पत संस्था मर्या नागपूर शाखा/वसूली केंद्र पंचखेडी चे लिपीक व एजंट आरोपी क. 1) अमित देवराव करूडकर, वय 33 वर्षे, रा. फेगड, ता. कुही, 2) डाकराम रोशन मोटघरे, वय 37 वर्षे, रा. परसोडी ता.कुही व 3) प्रमोद राजेराम डहारे, वय 34 वर्षे, रा.मांढळ ता.कुही यांनी संस्थेच्या खातेधारकाकडून पैसे घेवून ते खातेधारकाचे खात्यावर जमा न करता एकुण 20,10,947/–रू. स्वता वापरून त्या रकमेचा अपहार करून लोकांची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– निशीकांत केशवराव अहिरकर वय 33 वर्षे रा.प्लॉट नं 64 बी साईबाबा नगर नागपूर 34 यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम 408,409,420,34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि नितेश डोर्लिकर 9595678234 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर